RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २१] गुरुवार, मे १९, २०१६/वैशाख २९, शके १९३८ [पृष्ठे ९, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**—महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . | १-९ |

---

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ मे २०१६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IX OF 2016.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये,— १९४९ चा ५९.

(क) पहिल्या परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु, तीन पेक्षा कमी नाहीत व पाच पेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य, निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :" ; २०१६ चा महा. अध्या. ९.

(ख) पहिल्या परंतुकामध्ये, "परंतु," या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.**

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात, यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "नगरपरिषदा अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील,— १९६५ चा महा. ४०.

(क) खंड (७) मधील,—

(एक) "परिषदेचा सदस्य" या मजकुरानंतर, ", थेट निवडून आलेला अध्यक्ष" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) उप खंड (दोन) मधील, "परिषदेचा अध्यक्ष म्हणून किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (१२) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(१२) "निवडणूक" याचा अर्थ, परिषदेची किंवा यथास्थिती, अध्यक्षाच्या पदाची निवडणूक, असा आहे, आणि त्यात कोणत्याही पोट निवडणुकीचा समावेश होतो ;".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

४. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये, "परिषद सदस्य ;" या मजकुराऐवजी, "अध्यक्ष व परिषद सदस्य ; " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १० ची सुधारणा.

५. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम १० मधील, पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

२०१६ चा महा. अध्या. ९.

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ याच्या प्रारंभानंतर, नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य परंतु तीन पेक्षा अधिक नाहीत एवढे परिषद सदस्य निवडून देण्यात येतील, आणि कलम १४ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ५१ अ-१अ समाविष्ट करणे.

६. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१ नंतर, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

२०१६ चा महा. अध्या. ९.

अध्यक्षाची थेट निवडणूक.

**"५१ अ-१अ.** (१) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, कलम ५१-१अ याच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक नगरपरिषदेचा एक अध्यक्ष असेल व तो कलम ११ अन्वये तयार केलेल्या नगरपालिका मतदारांच्या यादीमध्ये ज्यांची नावे समाविष्ट केली आहेत, अशा व्यक्तींमधून निवडण्यात येईल.

(२) कलम १५ अन्वये परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्ह असणारी प्रत्येक व्यक्ती निवडणुकीत अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल.

(३) अध्यक्षाची निवडणूक परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच एक समयावच्छेदेकरून घेण्यात येईल आणि परिषदेच्या निवडणुका घेण्यासंबंधातील कार्यपद्धती अशा निवडणुकीस योग्य त्या फेरफारांसह, लागू होईल.

(४) निवडणुकीच्या वेळी जर अध्यक्ष निवडण्यात आला नाही तर, अध्यक्ष निवडण्यासाठी नव्याने निवडणूक घेण्यात येईल आणि नव्याने घेतलेल्या निवडणुकीत अध्यक्ष निवडून देण्यास अपयश आले तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी रिक्त जागा, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्या मधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.

(५) पोट-कलम (४) किंवा (७) अन्वये निवडून आलेली कोणतीही व्यक्ती या कलमान्वये निवडणुकीत यथोचितरीत्या निवडून आली असल्याचे मानण्यात येईल.

(६) अध्यक्षांच्या निवडणुकीत, समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल राज्य निवडणूक आयुक्ताद्वारे किंवा, त्या प्रयोजनार्थ त्याच्याकडून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(७) निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या मुदतीत, अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणामुळे रिकामे झाले असेल तर, त्याबाबतीत, पोट-कलमे (१) ते (६) यामध्ये तरतूद केलेली कार्यपद्धती लागू होईल, आणि असा अध्यक्ष असे पद रिक्त झाले नसते तर त्याचा पूर्वाधिकारी अशा नैमित्तिक रिक्त पदावर जेवढ्या मुदतीकरिता राहीला असता तेवढ्याच उर्वरित मुदतीकरिता अध्यक्ष असेल :

परंतु, निवडून आलेल्या परिषद सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होत असेल त्या दिनांकापूर्वी ६ महिन्यांच्या आत पद रिक्त झाले तर ते पद, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्या मधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.

(८) अध्यक्षाच्या निवडणुकीसंदर्भात वाद निर्माण झाल्यास, त्याबाबतीत कलम २१ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(९) जिल्हाधिकारी, नगरपरिषदेची आणि अध्यक्षाची सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर, अध्यक्षाचे नाव व निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून २५ दिवसांच्या आत नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा बोलावील. या सभेमध्ये कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये, परिषद सदस्यांचे नामनिर्देशन विहित रीतीने करण्यात येईल.”.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ५१अ ची सुधारणा.

**७.** नगरपरिषदा अधिनियमाचे कलम ५१अ याच्या पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

“(६अ) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ याच्या प्रारंभानंतर ज्या परिषदांमध्ये अध्यक्ष थेट निवडलेले आहेत त्या परिषदांच्या बाबतीत, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :— २०१६ चा महा. अध्या. ९.

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“(१) प्रत्येक नगरपरिषदेचा एक उपाध्यक्ष असेल जो, कलम ५१अ-१अ च्या पोट-कलम (९) अन्वये बोलविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडून दिला जाईल.” ;

(दोन) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“(६) कलम ५५अ च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील आणि त्याची मुदत परिषदेच्या मुदतीबरोबर समाप्त होईल.”.”.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ५१ब ची सुधारणा.

**८.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१ब मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

“(४) या कलमाच्या तरतुदी, कलम ५१अ-१अ खाली निवडून आलेल्या अध्यक्षास लागू होणार नाहीत.”.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

**९.** नगरपरिषदा अधिनियमाचे कलम ५२ याला, त्याचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात येईल आणि असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

“(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ५१अ-१अ च्या पोट-कलम (१) अन्वये निवडून दिलेल्या अध्यक्षाचा पदावधी पाच वर्षांचा असेल आणि तो परिषदेच्या मुदतीबरोबर समाप्त होईल.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकाला ज्यांनी अध्यक्षांची पदे धारण केली असून ज्या नगरपरिषदांच्या बाबतीत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आलेल्या आहेत अशा अध्यक्षांच्या पदावधीसाठी पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही आणि या कलमाच्या तरतुदी, या अध्यादेशाच्या अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास अस्तित्त्वात असल्याप्रमाणे अशा अध्यक्षाच्या मुदतीसाठी लागू असणे चालू राहील.”. २०१६ चा महा. अध्या. ९.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ५५ ची सुधारणा.

**१०.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

“परंतु, थेट निवडून आलेल्या अध्यक्षाच्या बाबतीत तो निवडून आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत आणि परिषद सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेल्या अध्यक्षाच्या बाबतीत तो निवडून आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, असा कोणताही ठराव आणता येणार नाही.”.

**११.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ३४१ब नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ यामध्ये कलमे ३४१ब-१ ते ३४१ब-६ समाविष्ट करणे.

"**३४१ब-१.** (१) कलम ५१-१अ च्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक नगरपंचायतीचा अध्यक्ष असेल व तो निवडून आलेल्या परिषद सदस्यांकडून त्यांच्यामधून निवडण्यात येईल. नगरपंचायतीच्या अध्यक्षाची निवडणूक.

(२) नगरपंचायतीवर निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये, **राजपत्रात**, ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येतील किंवा, यथास्थिति, प्रथम प्रसिद्ध करण्यात येतील, त्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी, अध्यक्षाला निवडून देण्यासाठी परिषद सदस्यांची एक विशेष सभा बोलावील :

परंतु, या कलमाखालील अशी सभा मावळत्या परिषद सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी घेता येणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा जिल्हा अधिकारी याबाबत लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला, नगरपंचायतीच्या अध्यक्षाला नगरपंचायतीच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सभेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणावरून, अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल.

(४) कोणतेही नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयामुळे बाधित झालेल्या कोणत्याही परिषद सदस्यास, असा निर्णय कळविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्याकडे अपील सादर करता येईल आणि त्याचवेळी त्यास, अशा अपिलाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास देता येईल. संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रादेशिक संचालक असे अपील निकालात काढील. प्रादेशिक संचालकाचा अशा अपिलावरील निर्णय आणि केवळ अशा निर्णयास (कोणताही असल्यास) अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा किंवा यथास्थिति, अशा अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्यासंबंधीच्या निर्णयावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

(५) अध्यक्षाच्या निवडणुकीत जर समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल व चिठ्ठ्या टाकण्याचे काम जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा पीठासीन अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, तो ठरवील अशा रीतीने करण्यात येईल.

(६) अध्यक्षाच्या निवडणुकीबाबतचा कोणताही वाद राज्य शासनाकडे विचारार्थ पाठवण्यात येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(७) अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर, उपाध्यक्षाची निवड करण्यासाठी नगरपंचायत आपली सभा चालू ठेवील.

(८) जर अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाले असेल तर, अध्यक्षाच्या नंतरच्या निवडणुकीकरिता, पोट-कलमे (२) ते (६) (दोन्ही धरून) यात ठरवून दिलेली कार्यपद्धती लागू होईल, मात्र पद रिकामे झाल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी विशेष सभा बोलवील.

(९) पोट-कलम (२) च्या तरतुदींन्वये निवडून दिलेल्या अध्यक्षाचा अडीच वर्षाचा पहिला पदावधी समाप्त झाल्यानंतर अध्यक्षाच्या पदाची नंतरची निवडणूक, आधीच्या अध्यक्षाचा उक्त कालावधी समाप्त होण्याच्या दिवसाअगोदरच्या आठ दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल :

परंतु, नव्याने निवडून आलेला अध्यक्ष मावळत्या अध्यक्षाचा पदावधी समाप्त होण्याच्या अखेरच्या दिवशी किंवा नंतरच्या दिवशी, कार्यभार स्वीकारील.

नगरपंचायतीच्या उपाध्यक्षाची निवडणूक.

**३४१ब-२.** (१) प्रत्येक नगरपंचायतीचा एक उपाध्यक्ष असेल, जो, कलम ३४१ब-१ च्या पोट-कलम (२) अन्वये बोलविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडून दिला जाईल.

(२) उपाध्यक्षाची निवड करण्याच्या सभेमध्ये जिल्हाधिकारी किंवा जिल्हा अधिकारी त्यासंबंधात विशेषकरून नामनिर्देशित करील असा इतर अधिकारी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारील, परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास मत देण्याचा अधिकार असणार नाही :

परंतु, सभेची कार्यपद्धती (तिच्या गणपूर्तीसह) विनियमित करण्यासाठी या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास किंवा, यथास्थिति, अशा सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्यास पुरेशी कारणे लेखी नोंदवून, अशी सभा स्थगित करण्यासाठी नकार देता येईल.

(३) उपाध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या अधिकाऱ्याकडून चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात येईल.

(४) जिल्हाधिकारी, अशा रीतीने निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव, अशा निवडणुकीपासून पंधरा दिवसांच्या आत **राजपत्रात** अधिसूचित करील.

(५) उपाध्यक्षाच्या निवडणुकीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत राज्य शासनाकडे निर्देश करण्यात येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(६) कलम ५५अ च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून अडीच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(७) उपाध्यक्षाचे पद, कोणत्याही कारणामुळे का होईना, रिकामे झाले असेल तर, पोट-कलम (१) ते (३) मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरून ते रिकामे पद भरण्यात येईल आणि अशा रीतीने निवडून आलेला उपाध्यक्ष, असे पद रिक्त झाले नसते तर त्याचा पूर्वाधिकारी अशा नैमितिक रिक्त पदावर जेवढ्या मुदतीकरिता राहिला असता तेवढ्याच उर्वरित मुदतीकरिता उपाध्यक्ष असेल.

नगरपंचायतीच्या परिषद सदस्यांचे नामनिर्देशन.

**३४१ब-३.** (१) जिल्हाधिकारी, अध्यक्ष, निवडून आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्याच्या प्रयोजनासाठी एक विशेष सभा बोलावील.

(२) कलम ९ च्या पोट-कलम (१) मधील, खंड (ब) अन्वये करावयाचे परिषद सदस्यांचे नामनिर्देशन, विहित रीतीने करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा अधिकारी याबाबत लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला नगर पंचायतीच्या अध्यक्षाला नगर पंचायतीच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी अशा सभेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणांवरून अशी सभा स्थागित करण्यास नकार देता येईल.

**३४१ब-४.** नगरपंचायतीच्या अध्यक्षांच्या पदाची मुदत ही अडीच वर्षांची असेल. नगरपंचायतीच्या अध्यक्षांचा पदावधी.

**३४१ब-५.** (१) परिषद सदस्यांनी विशेष सभेत एकूण परिषद सदस्यांपैकी कमीतकमी तीन चतुर्थांश बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय घेतला असला तर, नगरपंचायतीचा अध्यक्ष हा, अध्यक्ष असण्याचे बंद होईल : परिषद सदस्यांनी नगरपंचायतीच्या अध्यक्षास काढून टाकणे.

परंतु, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत असा कोणताही ठराव मांडता येणार नाही.

(२) अशी विशेष सभा बोलावण्यासाठी केलेल्या मागणीपत्रावर एकूण परिषद सदस्यांपैकी कमीतकमी निम्म्या परिषद सदस्यांनी सही केलेली असेल आणि ते जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) अन्वये पाठविण्यात आलेले मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत परिषदेची विशेष सभा भरवील :

परंतु, जेव्हा जिल्हाधिकाऱ्याने विशेष सभा भरवलेली असेल तेव्हा तो त्याबाबत अध्यक्षास कळवील.

(४) पोट-कलम (१) खालील ठरावावर विचार करण्यासाठी बोलावलेल्या सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अन्य अधिकारी स्वीकारील. परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अन्य अधिकाऱ्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

(५) नामनिर्देशित परिषद सदस्यांना अध्यक्षास काढून टाकण्याबाबतच्या कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(६) पोट-कलम (३) च्या प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये अध्यक्षाला काढून टाकण्याबाबत जर ठराव मांडण्यात आला नसेल किंवा, यथास्थिति, तो फेटाळण्यात आला असेल तर, अध्यक्षाला काढून टाकण्याबाबतचा कोणताही नवीन ठराव नगरपंचायतीपुढे मांडण्यात येणार नाही.

**३४१ब-६.** (१) नगरपंचायतीने विशेष सभेत एकूण परिषद सदस्यांपैकी कमीतकमी दोन तृतियांश बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय घेतला असेल तर, उपाध्यक्ष हा, उपाध्यक्ष असण्याचे बंद होईल : परिषद सदस्यांनी नगरपंचायतीच्या उपाध्यक्षास काढून टाकणे.

परंतु, उपाध्यक्षाची निवडणूक झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत असा ठराव मांडण्यात येणार नाही.

(२) अशी विशेष सभा बोलाविण्यासाठी केलेल्या मागणीपत्रावर एकूण परिषद सदस्यांपैकी कमीत कमी निम्म्या परिषद सदस्यांनी सही केलेली असेल आणि ते अध्यक्षांकडे पाठविण्यात येईल आणि अध्यक्ष, असे मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, नगरपंचायतीची विशेष सभा बोलावील, ज्यात नामनिर्देशित परिषद सदस्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) पोट-कलम (२) खालील प्रयोजनासाठी बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये जर उपाध्यक्षास काढून टाकण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला नाही, किंवा, यथास्थिति, तो फेटाळण्यात आला तर, अशा उपाध्यक्षाच्या पदावधीमध्ये अशा प्रकारे काढून टाकण्याचा ठराव नव्याने मांडण्यात येणार नाही.”.

प्रकरण चार

**संकीर्ण**

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१२.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदी अंमलात आणण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या प्रस्तुत उक्त अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निर्देश, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील.

१९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यांच्या विद्यमान तरतुदींनुसार, महानगरपालिकेतील आणि नगरपरिषदेतील प्रत्येक प्रभागातून अनुक्रमे केवळ एकच पालिका सदस्य आणि परिषद सदस्य निवडला जातो. तसेच नगरपरिषदेचा अध्यक्ष, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडला जातो.

विद्यमान स्थितीचा आढावा विचारात घेतल्यानंतर आणि महानगरपालिका व नगरपरिषदांच्या सुरळीत कामकाजाची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, राज्य शासनास, उक्त अधिनियमांच्या तरतुदींमध्ये यथोचितरित्या फेरबदल करणे इष्ट आहे असे वाटते.

२. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(एक) **बहुसदस्य प्रभाग पद्धती.**—महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक होणार नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील. नगरपरिषदेच्या बाबतीत, नगरपरिषदेच्या प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य परंतु तीन पेक्षा अधिक होणार नाहीत एवढे परिषद सदस्य निवडून देण्यात येतील. याकरिता १९४९ चा ५९ व १९६५ चा महा. ४० या अधिनियमांची अनुक्रमे कलमे ५ व १० यामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(दोन) **नगरपरिषदेच्या अध्यक्षाची थेट निवडणूक.**—नगरपरिषदेचा अध्यक्ष, परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये परिषदेच्या मतदारांद्वारे निवडण्यात येईल. तथापि, नगरपंचायतींच्या संबंधात अशी तरतूद लागू असणार नाही आणि नगरपंचायतींच्या अध्यक्षांच्या संबंधातील प्रचलित पद्धत लागू असणे पुढे चालू राहील.

परिणामी, जेथे अध्यक्ष, परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये परिषदेच्या मतदारांद्वारे निवडलेला आहे तेथे, उपाध्यक्षाच्या निवडणुकीच्या संबंधातील तरतुदींमध्ये फेरबदल करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार, उक्त प्रयोजनांसाठी १९६५ चा महा. ४० यातील कलमे २, ९, ५१अ, ५१ब, ५२, ५५ यांमध्ये यथोचितरित्या सुधारणा करण्याचे व नवीन कलमे ५१अ-१अ, ३४१ब-१, ३४१ब-२, ३४१ब-३, ३४१ब-४, ३४१ब-५ आणि ३४१ब-६ समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, आणि, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मुंबई,
दिनांक १९ मे २०१६.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ३३] गुरुवार, मे १९, २०१६/वैशाख २९, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक ५६

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporation and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016 (Mah. Ord. IX of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. J. JAMADAR,
Secretary and R. L. A. to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industiral Townships Amendment) Ordinance, 2016 (Mah. Ord. IX of 2016), published under the authority of the Governor.)

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 19th May 2016.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IX OF 2016.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Municipal Corporations Act and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

LIX of 1949. Mah. XL of 1965.

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Municipal Corporations Act and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and Commencement.

**1.** *(1)* This Ordinance may be called the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016.

*(2)* It shall come into force at once.

## CHAPTER II

### AMENDMENT TO THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT

Amendment of section 5 of LIX of 1949.

**2.** In section 5 of the Maharashtra Municipal Corporations Act, in sub- section *(3)*,— LIX of 1949.

*(a)* before the first proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, after the commencement of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016, in respect of the general elections to the Corporation, each of the wards shall elect as far as possible four Councillors but not less than three and not more than five Councillors, and each voter shall, notwithstanding anything contained in this Act, be entitled to cast the same number of votes, as the number of Councillors to be elected in his ward : " ; Mah. Ord. IX of 2016.

*(b)* in the first proviso, for the words "Provided that" the words "Provided further that" shall be substituted.

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965

Amendment of section 2 of Mah. XL of 1965.

**3.** In section 2 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Municipal Councils Act"),— Mah. XL of 1965.

*(a)* in clause *(7)*,—

*(i)* after the words "a member of the Council," the words "the directly elected President" shall be inserted ;

*(ii)* in sub-clause *(ii)*, the words " a President of the Council or" shall be deleted ;

*(b)* for clause *(12)*, the following clause shall be substituted, namely :—

"*(12)* "election" means an election to a Council or to the office of the President, as the case may be, and includes any by-election;".

Amendment of section 9 of Mah. XL of 1965.

**4.** In section 9 of the Municipal Councils Act, in sub-section *(1)*, in clause *(a)*, for the word "Councillors" the words "the President and the Councillors" shall be substituted.

Amendment of section 10 of Mah. XL of 1965.

**5.** In section 10 of the Municipal Councils Act, to sub-section *(2)*, the following proviso shall be added, namely :—

Mah. Ord. IX of 2016. "Provided that, after the commencement of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016, in respect of the general elections to the Council, each of the wards shall elect as far as possible two Councillors but not more than three Councillors, and each voter shall, notwithstanding anything contained in sub-section (*2*) of section 14, be entitled to cast the same number of votes, as the number of Councillors to be elected in his ward.".

**6.** After section 51 of the Municipal Councils Act, the following section shall be substituted, namely :— Insertion of section 51A-1A in Mah. XL of 1965.

Mah. Ord. IX of 2016. **"51A-1A.** (*1*) After the date of commencement of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016, in respect of the general elections to the Council, subject to the provisions of section 51-1A, every Council shall have a President who shall be elected by the persons whose names are included in the municipal voters list prepared under section 11. Direct Election of President.

(*2*) Every person qualified to be elected as a Councillor under section 15 shall be qualified to be elected as a President at an election.

(*3*) Election of the President shall be held simultaneously with the general elections of the Council and the procedure regarding holding of elections to the Council shall, *mutatis mutandis,* apply to such election.

(*4*) If at an election, no President is elected, a fresh election shall be held to elect a President, and if there is a failure to elect a President at the fresh election, such vacancy may, notwithstanding anything contained in this Act, be filled by election by the elected Councillors from amongst themselves.

(*5*) Any person elected under sub-section (*4*) or (*7*) shall be deemed to be duly elected at an election under this section.

(*6*) If, in the election of the President, there is an equality of votes, the result of the election shall be decided by lots to be drawn by the State Election Commissioner or the officer appointed by him for the purpose.

(*7*) If, during the term of the elected Councillors, there is a vacancy in the office of the President due to any reason, the same procedure as provided in sub-sections *(1)* to *(6)* shall apply and such President shall remain in office only for the remainder of the term, for which his predecessor would have remained in office but for such casual vacancy :

Provided that, if a vacancy occurs, which is within six months prior to the date on which the term of office of the elected Councillors expires, the same shall be filled in by election from amongst the elected Councillors.

(*8*) in case of a dispute regarding election of the President, the provisions of section 21 shall, *mutatis mutandis,* apply.

(*9*) The Collector shall convene first general meeting of the Council within twenty-five days from the date on which the name of the President and the elected Councillors is published in the *Official Gazette* after the general election of the Council and the President. The nomination of the Councillors under clause *(b)* of sub-section *(1)* of section 9 shall be made in the prescribed manner in this meeting.".

Amendment of section 51A of Mah. XL of 1965.

**7.** In section 51A of the Municipal Councils Act, after sub-section (*6*), the following sub-section shall be inserted, namely :—

"*(6A)* In respect of the Councils to which the President is directly elected after the commencement of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016, the provisions of this section shall apply with the following modifications :— Mah. Ord. IX of 2016.

(*i*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

"(*1*) Every Council shall have a Vice- President, who shall be elected by the elected Councillors amongst themselves in the first general meeting convened under sub-section (*9*) of section 51A-1A.";

(*ii*) for sub-section (*6*), the following sub-section shall be substituted, namely :—

"(*6*) Subject to the provisions of section 55A and other provisions of this Act, the Vice-President shall hold the office for a term of five years from the date of his election and his term shall be co-terminus with the term of the Council.".".

Amendment of section 51B of Mah. XL of 1965.

**8.** In section 51B of the Municipal Councils Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be added, namely :—

"(*4*) The provisions of this section shall not apply when the President is elected under section 51A-1A.".

Amendment of section 52 of Mah. XL of 1965.

**9.** Section 52 of the Municipal Councils Act shall be re-numbered as sub-section (*1*) thereof, and after sub-section (*1*), as so re-numbered, the following sub-sections shall be added, namely :—

"(*2*) Notwithstanding anything contained in sub-section *(1),* the term of office of the President, elected under sub-section *(1)* of section 51A-1A, shall be of five years and shall be co-terminus with the term of the Council.

(*3*) Nothing in sub-section (*2*) shall apply to the term of office of the Presidents who are holding the office in respect of the Council for which general elections have been held prior to the date of commencement of the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016 and the provisions of this section, as it existed on the date immediately preceding such date of commencement, shall continue to apply in respect of the term of office of such Presidents.". Mah. Ord. IX of 2016.

Amendment of section 55 of Mah. XL of 1965.

**10.** In section 55 of the Municipal Councils Act, in sub-section *(1),* for the proviso, the following proviso shall be substituted, namely :—

" Provided that, no such resolution shall be moved within a period of two years from the date of election of the directly elected President and in case of the President elected by the Councillors from amongst themselves, within one year from the date of such election.".

Insertion of sections 341B-1 to 341B-6 in Mah. XL of 1965.

**11.** After section 341B of the Municipal Councils Act, the following sections shall be inserted, namely :—

"**341B-1.** (*1*) Subject to the provisions of section 51-1A, every *Nagar Panchayat* shall have a President who shall be elected by the elected Councillors from amongst themselves. Election of President of *Nagar Panchayat*.

(*2*) The Collector shall, within twenty-five days from the date on which the names of the Councillors elected to *Nagar Panchayat* are published or, as the case may be, first published under sub-section *(1)* of section 19, in the *Official Gazette,* convene a special meeting of the Councillors for election of a President :

Provided that, a meeting under this section shall not be held before the expiry of the term of office of the outgoing Councillors.

(*3*) The meeting called under sub-section (*2*) shall be presided over by the Collector or such officer as the Collector may by order in writing appoint in this behalf. The Collector or such officer shall, when presiding over such meeting, have the same powers as the President of a *Nagar Panchayat* when presiding over a meeting of the *Nagar Panchayat* has, but shall not have the right to vote :

Provided that, notwithstanding anything contained in this Act for regulating the procedure at meetings (including the quorum required thereat), the Collector or the officer presiding over such meeting may, for reasons which in his opinion are sufficient, refuse to adjourn such meeting.

(*4*) Any Councillor aggrieved by any decision of the Collector or such officer, accepting or rejecting any nomination paper, may, within forty-eight hours from intimation of such decision, present an appeal to the Regional Director of Municipal Administration concerned and simultaneously give notice of such appeal to the Collector or such officer. Such appeal shall be disposed of by the Regional Director, as expeditiously as possible, after giving a reasonable opportunity of being heard to the parties concerned. The decision of the Regional Director on such appeal, and subject only to such decision (if any), the decision of the Collector or such officer, as the case may be, accepting or not, shall not be called in question in any Court.

(*5*) If, in the election of the President there is an equality of votes, the result of the election shall be decided by lots to be drawn in the presence of the Collector or the officer presiding in such manner as he may determine.

(*6*) Any dispute regarding election of the President shall be referred to the State Government whose decision in that behalf shall be final.

(*7*) After election of the President, the *Nagar Panchayat* shall continue its meeting for the purpose of electing the Vice-President.

(*8*) If there is a vacancy in the office of the President due to any reason whatsoever, then for subsequent election of a President, the same procedure as laid down in sub-sections (*2*) to *(6)* (both inclusive) shall apply except that the special meeting shall be called by the Collector within twenty-five days from the date on which the vacancy occurs.

(*9*) The subsequent election to the post of the President after expiry of the first term of the two and a half years of the President elected under the provisions of sub-section (*2*), shall be held within a period of eight days prior to the expiry of the said term of the earlier President :

Provided that, the newly elected President shall take charge on the last day of the term of the outgoing President or next day thereafter.

Election of Vice-President of *Nagar Panchayat.*

**341B- 2.** (*1*) Every *Nagar Panchayat* shall have a Vice-President, who shall be elected by the elected Councillors from amongst themselves in the special meeting convened under sub-section (*2*) of section 341B-1.

(*2*) The meeting to elect the Vice-President shall be presided over by the Collector or such officer as the Collector may nominate specially in this behalf, but the Collector or such other officer shall have no right to vote:

Provided that, notwithstanding anything contained in this Act or the rules made thereunder, for regulating the procedure at meetings (including the quorum thereat), the Collector or, as the case may be, the officer, presiding over such meeting may, for sufficient reasons to be recorded in writing, refuse to adjourn such meeting.

(*3*) If, in the election of the Vice-President, there is equality of votes, the result of the election shall be decided by the officer presiding over such meeting by drawing lots.

(*4*) The name of the Vice-President so elected shall be notified by the Collector, in the *Official Gazette,* within fifteen days from such election.

(*5*) Any dispute regarding the election of the Vice-President shall be referred to the State Government, whose decision thereon shall be final.

(*6*) Subject to the provisions of section 55A and other provisions of this Act, the Vice-President, shall hold the office, for a term of two and half years from the date of his election.

(*7*) If there is any vacancy in the office of the Vice-President for any reason whatsoever, the vacancy shall be filled up by following the procedure prescribed in sub-sections *(1)* to *(3)* and the Vice-President so elected shall remain in office only for the remainder of the term, for which his predecessor would have remained in office but for such vacancy.

Nomination of Councillors of *Nagar Panchayat.*

**341B- 3.** (*1*) The Collector shall, within seven days from the date of election of the President, call a special meeting for the purpose of nominating Councillors.

(*2*) The nominations of the Councillors under clause (*b*) of sub-section (*1*) of section 9, shall be made in the prescribed manner.

(*3*) The meeting called under sub-section (*1*) shall be presided over by the Collector or such officer as the Collector may by order in writing appoint in this behalf. The Collector or such officer shall, when presiding over such meeting, have the same powers as the President of a *Nagar Panchayat* when presiding over a meeting of the *Nagar Panchayat* has, but shall not have the right to vote :

Provided that, notwithstanding anything contained in this Act for regulating the procedure at meetings (including the quorum required thereat), the Collector or the officer presiding over such meeting may, for reasons which in his opinion are sufficient, refuse to adjourn such meeting.

Term of office of President of *Nagar Panchayat.*

**341B-4.** The term of office of the President, shall be of two and half years.

**341B- 5.** (*1*) A President of a *Nagar Panchayat* shall cease to be the President if the Councillors by a resolution passed at a special meeting by majority not less than three fourths of the total number of Councillors so decides : Removal of President of *Nagar Panchayats* by Councillors.

Provided that, no such resolution shall be moved within a period of one year from the date of the election of the President.

(*2*) The requisition for such special meeting shall be signed by not less than one-half of the total number of Councillor's and shall be sent to the Collector.

(*3*) The Collector shall, within ten days of the receipt of a requisition under sub-section (*2*), convene a special meeting of the Council :

Provided that, when the Collector convenes a special meeting, he shall give intimation thereof to the President.

(*4*) A meeting to consider a resolution under sub-section *(1)* shall be presided over by the Collector or any other officer authorised by him in this behalf, but the Collector or such other officer shall have no right to vote.

(*5*) The nominated Councillors shall have no right to vote on any resolution relating to the removal of the President.

(*6*) If the resolution seeking the removal of the President is not moved or, as the case may be, rejected, in the special meeting convened for the purpose under sub-section (*3*), no fresh resolution seeking the removal of the President shall be brought before the *Nagar Panchayat.*

**341B- 6.** (*1*) A Vice-President shall cease to be the Vice-President, if the *Nagar Panchayat* by a resolution passed by a majority of not less than two-thirds of the total number of the Councillors, at a special meeting, so decides : Removal of Vice-President of *Nagar Panchayats* by Councillors.

Provided that, no such resolution shall be moved within a period of six months from the date of election of the Vice-President.

(*2*) The requisition for such special meeting shall be signed by not less than one-half of the total number of Councillors and shall be sent to the President, and the President shall, within ten days of the receipt of such requisition, convene a special meeting of the *Nagar Panchayat,* where the nominated Councillors shall have no right to vote.

(*3*) If the resolution seeking removal of the Vice-President is not moved or as the case may be, rejected, in the special meeting convened for the purpose under sub-section (*2*), no fresh resolution for such removal shall be brought during the tenure of such Vice-President.".

## CHAPTER IV
### MISCELLANEOUS

LIX of 1949. Mah. XL of 1965. **12.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Municipal Corporations Act or, as the case may be, the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, as amended by this Ordinance, the State Government may, as the occasion arises, by an Order published in the *Official Gazette,* give such directions not inconsistent with the provisions of the said Acts as amended by this Ordinance, as may appear to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty. Power to remove difficulty.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

## STATEMENT

As per the existing provisions of the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949) and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), each ward in the Municipal Corporation and the Municipal Council elects only one Councillor. Also the President of a Municipal Council is elected by the elected Councillors from amongst themselves.

After taking the review of the present position and with a view to ensure the smooth functioning of the Corporations and the Municipal Councils, the State Government considers it expedient to suitably modify the provisions of the said Acts.

2. The salient features of the proposed amendments are as under:-

(*i*) *Multi-member ward system.*—It is proposed to provide that, each of the wards of the Municipal Corporation shall elect, as far as possible four Councillors but not less than three and not more than five Councillors. In case of a Municipal Council, each ward of a Municipal Council shall elect two Councillors but not more than three Councillors. It is proposed to amend sections 5 and 10 of Acts LIX of 1949 and Mah. XL of 1965, respectively.

(*ii*) *Direct election of President of a Municipal Council.*—It is proposed to provide that, the President of a Municipal Council shall be elected by the voters of the Council at the general election of the Council. However, such provision would not apply in respect of the *Nagar Panchayats* and the system in vogue, in respect of the Presidents of the *Nagar Panchayats* shall continue to apply.

Consequently, it is also proposed to modify the provisions relating to the election of Vice-President, where the President is elected by the voters of the Council at the general election of the Council.

Accordingly, it is proposed to amend sections 2, 9, 51A, 51B, 52, 55 and insert new sections 51A-1A, 341B-1, 341B-2, 341B-3, 341B-4, 341B-5 and 341B-6 in Mah. XL of 1965, suitably, for the aforesaid purposes.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949) and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 19th May 2016.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANISHA PATANKAR-MHAISKAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.